महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:-डब्ल्यूईबी-१०२०/सीआर-२६/२०२१/तेवीस दिनांक:-३० सप्टेंबर, २०२१

# -: प्रसिध्दीपत्रक:-

**विषय:-ऑनलाईन अर्जप्रणाली-खाते अद्ययावत करण्यासंदर्भात**

संदर्भ:- दिनांक २७ मे, २०२१ व दिनांक ११ ऑगस्ट, २०२१ रोजीचे प्रसिध्दीपत्रक

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या https://mpsconline.gov.in ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळावरील खात्याचा पासवर्ड व खात्यातील तपशील अद्ययावत करण्यासंदर्भात आयोगाच्या दिनांक २७ मे, २०२१ व दिनांक ११ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकान्वये सूचना करण्यात आली होती. तथापि, अद्यापही अनेक उमेदवारांनी खाते अद्ययावत करण्यासंदर्भातील कार्यवाही केली नसल्याचे दिसून येते.

२. आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळावरील खात्याचा वापर करण्यासाठी पुढील प्रक्रिया करावी:-

(१) पहिल्यावेळी लॉगीन करण्यापूर्वी खात्याचा पासवर्ड अद्ययावत/पुनर्स्थापित करावा. पासवर्ड अद्ययावत / पुनर्स्थापित करण्याकरीता खात्यामध्ये नोंदविण्यात आलेल्या मोबाईल क्रमांक व/अथवा ईमेल आयडीवर 'ओटीपी' प्राप्त होईल.

(२) मोबाईल क्रमांक अथवा ईमेलआयडी व नवीन पासवर्ड यांचा वापर करुन खात्यामध्ये लॉगीन करावे.

(३) खात्यामधील तपशील अद्ययावत करुन खाते 'लॉक' करावे.

३. आयोगाकडून पुढील महिन्यात स्पर्धा परीक्षांच्या जाहिराती प्रसिध्द करण्याचे नियोजित आहे. जाहिराती प्रसिध्द झाल्यानंतर खाते अद्ययावत करण्यात आलेले नसल्यास इच्छुक उमेदवारांना अर्ज करणे शक्य होणार नाही. यास्तव, उमेदवारांनी जाहिरातीस अनुसरुन सुलभपणे अर्ज करता यावा, याकरीता तात्काळ त्यांच्या खात्याचा पासवर्ड व खाते अद्ययावत करुन घ्यावे.

४. जुन्या संकेतस्थळावरील खात्यामध्ये नमूद मोबाईल क्रमांक व/अथवा ईमेल आयडी विसरला असल्यास अथवा अन्य कोणत्याही कारणामुळे वापरता येत नसल्यास ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळाच्या मुखपृष्ठावरील 'Forgot/Reset Email Id and Mobile Number' या लिंकवरुन मोबाईल क्रमांक व/अथवा ईमेल आयडी अद्ययावत करता येईल.

५. आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळावरील खात्याचा वापर करण्यासंदर्भात उमेदवारांसाठी मार्गदर्शक सूचना / प्रक्रिया सदर संकेतस्थळावरील 'Guidelines for Candidate' अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. सदर प्रक्रिया / सूचनांचे अवलोकन केल्यास उमेदवारांना खाते अद्ययावत करणे सुलभ होऊ शकेल.

ठिकाण:- मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.